# परिशिष्ट – २

## सत्यवचन योग्यरीतीने आचरणात कसे आणावे याच्या अभ्यासात साहाय

"तू सत्याचे वचन नीट सांगणारा, लाज वाटल्यास कसलेंही कारण नसलेला कामकरी असा देवाला पटलेला असा स्वत:ला सादर करण्यात येईल तितके करं" (२ तिमथ्य.२:१५).

**सत्याचे वचन (पवित्र शास्त्र) –** चांगल्या रीतीने कामात आणण्यासाठी फार आवश्यक आहे. अन्य गोष्टीसोबत, याचा अर्थ आहे की, जुन्या नवीन करारातील अंतराला समजते, जुना करार एक प्रतिबिंब आहे व नवीन करार वास्तविक आहे (इब्री.१०:१). जुन्या कराराला वधस्तंभाला "खिळून रद्द केला" आणि आत्मिक दृष्टिकोनातून आपण आता नवीन कराराच्या अधिन आहोत (कलस्सै.२:१४). जुना करार उदाहरणांसाठी तसेच हे दाखवण्यासाठी आवश्यक आहे की परमेश्वर कसा प्रत्येक वेळेस आपली आश्वासने पूर्ण करतो (१ करिंथ.१०:६). परमेश्वराने जुन्या करारात केलेली आपली आश्वासने केली, परंतु नवीन करारात ती पूर्ण झाली (पुढील पानावरील कोष्टकांचा अभ्यास करा).

## सत्याच्या वचनाला चांगल्या रीतीने कामात आणणे
## २ तिमथ्य २:१५

| **जुना करार** | **नविन करार** |
| --- | --- |
| **आश्वासने दिली गेली** (उत्पत्ती ३:१५; १२:३) | **आश्वासने पूर्ण झालीत** |
| १. राज्य स्थापित होने (दानियल २:४४) | मार्क.९:१; प्रे.कृ.१:८; २:१–४; लूक.२२:२९,३०; करिंथ.११:२३ |
| २. परमेश्वराचे मंदिर स्थापण्यात येईल (यशया २:२,३) | इब्रि.१०:२१; १ तिमथ्य.३:१५ |
| *''शेवटच्या दिवसांत असे होईल'' यरूशलेमपासून आरंभ होऊन सर्व राष्ट्रातील लोक येतील.* | प्रे.कृ.२:१६,१७; इब्रि.१:१,२ लूक.२४:४६,४७; प्रे.कृ.१:४–८ प्रे.कृ.२:९; रोम.१:१६ |
| ३. ख्रिस्त राजा होईल (यिर्मया २३:५,६) | मत्तय.२८:१८; प्रे.कृ.२:२९–३३ |
| ४. नवीन करारात बांधले जाने (यिर्मया ३१:३१) | मत्तय.१६:१८,१९; प्रे.कृ.२:३६–३८; इब्रि.९:१५–१७ |
| ५. पवित्र आत्म्याचा मनुष्यमात्रावर वर्षाव होतो (थोएल २:२८) | प्रे.कृ.२:१६–२१ |

मंडळींसबंधी केलेली सर्व आश्वासने प्रेषितांची कृत्ये २ पूर्ण झाली आहेत जो की एकच दिवस म्हणजेच ''पेंटेकॉस्टच्या'' दिवसाविषयीचे वर्णन केले आहे.

प्रेषितांची कृत्ये दुसऱ्या अध्यायाचे पहिले प्रत्येक वचनात राज्याच्या भविष्यात होण्याची गोष्ट केली आहे. (यशया २:२–४; मिखा ४:१,२; दानि.२:४४; मत्तय.३:१,२; ६:९,१०; १६:१८; मार्क.९:१)

**प्रेषितांची कृत्ये अध्याय २ : 'पेंटेकॉस्ट'**

प्रेषितांची कृत्ये २ नंतर प्रत्येक वचनामध्ये राज्याचे अस्तित्वामध्ये असल्याबाबत गोष्ट केली आहे. (प्रे.कृ.२:४७; कलस्सै.१:१३,१४)

## पवित्र शास्त्रानुसार नवीन मंडळीची स्थापना कशी करावी.

**एका स्वतंत्र देहाच्या रूपामध्ये :** प्रत्येक मंडळी ही देवाच्या मंदिराचे वेगळा व स्वतंत्र शरीर आहे. एक मंडळी ही दुसऱ्या मंडळीच्या वर कधी हो शकत नाही. मंडळयांचे संगठन असो किंवा कोणतेही संगठन यामध्ये कोणीही स्थानिक मंडळीपेक्षा मोठीनीही आहे.

**ख्रिस्ताच्या देहाच्या रूपाने** : पवित्रशास्त्रामध्ये मंडळीला ख्रिस्ताचे शरीर म्हटले गेले आहे. या अलंकारीक भाषेमध्ये आम्ही बघतो की **ख्रिस्त** हा शरीराचे मस्तक आहे (कलस्सै १:१८; इफिस १:२२) जसे शरीराच्या प्रत्येक भागाचे आपआपली कामे (कार्ये) आहेत. तसेच ख्रिस्ताच्या शरीराच्या भागांचेसुध्दा आहे. मंडळीचा कोणताही सदस्य, दुसऱ्या सदस्यापेक्षा अधिक महत्त्वाचा नाही आहे. संपूर्ण शरीर अर्थात मंडळी च्या भलाईसाठी प्रत्येकाचे आपले स्थान आणि योगदान आहे.

**येशू, फक्त एकच मस्तकाच्या रूपात :** ख्रिस्त ''मंडळीचे मस्तक'' आहे आणि या प्रकारे त्याच्याजवळ सर्व अधिकार आहेत (मत्तय.२८:१८). मंडळीच्या स्थापनेत कोणत्याही प्रकारचे परिवर्तन करण्याची आज्ञा कोणालाही नाही आहे कारण असे करण्याचे कोणालाही अधिकार नाहीत.

**वडिलांच्या देखरेखेखाली** : स्थानिक मंडळी जेव्हा संस्थेच्या अध्यात्मिक परिपक्वतेत वाढू लागतात तेव्हा मंडळीतील वडीलधाऱ्या पुरूषांपैकी सेवा करण्यासाठी त्यांची नियुक्त करावे. या लोकांना मंडळीद्वारेच निवडले पाहिजे ते आपण स्वत:हून नियुक्त होऊ शकत नाही. वडीलधाऱ्यांना ''मेंढपाळ'' संबोधण्यात येत आणि ते कळपाची राखण व त्यांची सेवा करत आहेत (१ पेत्र ५:१—५). वडीलधाऱ्यांची पात्रता तिमय्याला पहिले १ तिमथ्य ३:१—८ आणि तीत १:५—८ मध्ये पहावयास मिळते. मंडळीची स्थापना वडीलांच्या व सेवकांची नियुक्ती विना होऊ शकते. सुरूवातीला मंडळींना यांच्याविना अस्तित्वात येणे आवश्यक आहे. कारण या जागांवर सेवा करण्यासाठी जी पात्रता असण्यासाठी अनेक वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

**सेवेसाठी, सेवकांच्या (डिकन) नियुक्तीमुळे** : पुरूष लोकांना मंडळीच्या सेवे मध्ये ''डिकन'' या पदावर नियुक्त केले जाते ते सर्व वडिलांच्या अधीन राहून काम करतात (फिलपै १:१; प्रे.कृ. २०:२८). त्यांची पात्रता १ तिमथ्य ३:८—१३ मध्ये सांगितले आहेत.

## ''ख्रिस्ती पुरूष''

ख्रिस्ती माणसाच्या जबाबदाऱ्यासुध्दा कित्येक प्रकारे तशाच आहेत जसे की ख्रिस्ती स्त्रिच्या जबाबदाऱ्या दोघांनीही मंडळीतील सभांमध्ये खऱ्या अंत:करणाने उपस्थित राहते (इब्री १०:२५), उदार मनाने वर्गण्या देणे (१ करिंथ १६:२), शुध्द व निर्मळ धर्माचरण करणे (याकोब १:२७), शुभवर्तमान सांगणे (मत्तय २८:१९,२०), पवित्र शास्त्राचा अभ्यास करणे (२तिमथ्य २:१५, बघा प्रे.कृ.१७:११), आणि आध्यात्मिक विकास करणे (१ पेत्र.२:२) आवश्यक आहे.

### ख्रिस्ती मनुष्याने काय करू नये :

१. त्याने आपल्या पत्नीला व लेकरांना शिवीगाळ करू नये (इफिस ५:२५—३१, १पेत्र ३:७, १थेस्सल २:११).
२. त्याने हिंसक होता कामा नये (रोम १२:१८).
३. त्याने जारकर्मापासून दूर राहावे (पहिले करिंथ ६:१८,१९).
४. तो वासनांचे व विलांसांचे दास्य करणारे नसावे (२तिमथ्य ३:४; तीत पत्र ३:३).
५. त्याने अभावनिक किंवा भावनाहीन असू नये (लूक २२:६२; योहान ११:३५; प्रे.कृ.२०:३७).

### ख्रिस्ती मनुष्याने काय करावे :

१. त्यावर ख्रिस्ताच्या मंडळीचा धुरा सांभाळण्याची जबाबदारी आहे (१तीमथ्य २:८—१५; १करिंथ १४:३३,३४).
२. याने प्रेमाने आपल्या कुटुंबाची धुरा सांभाळावी (इफिस ५:२९—३३; कलसै ३:१८—२१; १ पेत्र ३:१—६; १करिंथ ११:२—५).
३. त्याला कुटुंबाच्या आध्यात्मिक व भौतिक गरजांना पूर्ण करावयाचे आहे (१तीमथ्य ५:८).
४. त्याला लक्षात ठेवायचे आहे की, त्याच्या मुलांचा प्रतिपाळ चांगल्यारीतीने व्हावा (इफिस ६:४).

## पुरूषांसाठी नवीन करारातील ''आदर्श''

१. सर्व क्ष(स्ती पुरूषांमध्ये 'मंडळीची धुरा' सांभाळण्याची पात्रता येण्याची आकांक्षा असली पाहिजे (''वडील असावेत तसेच सर्व ख्रिस्तीजन असले पाहिजेत'' तक्ता पहा परिशिष्ट २ मध्ये).
२. यांनी येशू प्रभूसारखी सेवक बनून सेवा करायला हवी (लूक.२२:२६).
३. पुरूष बर्णबासारखे, जसे पैशाचे (धनाचे) दान करणारा, आणि उत्स्फूर्त बोलणारे असावे (प्रे.कृ. ४:३६,३७).
४. फलेमोनाला लोकांनी आपल्या क्ष(स्ती सहकाऱ्यांचे स्वागत करावे (फिले २). आणि बंधुभावाच्या चांगुलपणासाठी व्यक्तिगत वैरभाव विसरून जाऊ शकतो (फिले १०—२०).

## ''ख्रिस्ती स्त्री''

### वचनानुसार ख्रिस्ती स्त्री काय करू शकत नाही :

१. तिला मंडळींच्या सभांमध्ये / ची धुरा सांभाळण्यास मनाई आहे (१ करिंथ.१४:३४, ३५; बघावे.१४:१९,२३,२६,२८). सभांमध्ये प्रचारक बोलत असतात, म्हणून तेथे क्ष्स्ती स्त्रियांनी मंडळयात उगेच रहावे. त्यांना बोलण्याची परवानगी नाही.

२. तिला पुरूषांवर धनीपण चालविण्याची मनाई आहे, म्हणूनच ती वडिलांच्या किंवा सेवकाच्या रूपात सेवा करू शकत नाही (१ तिमथ्य.२:१२; ३:२).

३. तिने आपल्या पत्नीच्या अधिकाऱ्यांची अवहेलना करू नये (१ करिंथ.११).

### वचनानुसार ख्रिस्ती स्त्री काय करू शकते :

१. तिला असे कोणत्याही कामाची धुरा सांभाळण्याची मनाई नाही, ज्यामध्ये तिचा पुरूषावर अधिकार नसेल.

२. तिला कोणत्याही वेगळया स्त्रिया किंवा लेकरे यांना शिकविण्याची मनाई नाही आहे काही परिस्थितीमध्ये ती पुरूषांना शिकवू शकते. अथवा शिकवण्यासाठी साहाय्य करू शकते (प्रे.कृ.१८:२४—२८; तीताला पत्र.२:४).

३. तिला कोणालाही प्रभूची / ख्रिस्ताची ओळख करून देणे, व्यक्तिगत काम करण्यास मनाई नाही.

४. तिला मंडळीत काय करणे, इथवर की असे काम करून पगार मिळवण्याचीसुध्दा मनाई नाही आहे, जे पवित्र शास्त्रानुसार तिला काम करणे योग्य असेल.

### स्त्रियांसाठी नवीन करारातील ''आदर्श''

१. येशूसोबत स्त्रिया असत, आणि त्याची त्या पैशाअडक्याने सेवाचाकरी करीत असत (मत्तय.२७:५५; लूक.८:१—३).

२. लाजरसाची बहीण, मरिया ही प्रभूच्या चरणांजवळ बसून त्याचे वचन ऐकत असे (लूक.१०:३९,४२).

३. मरिया मग्दालिया ही येशूची, समर्पित शिष्यीण होती, जी जिवंत परमेश्वराबद्दल दुसऱ्यांना फार उत्सुकतेने सांगत असे (योहान.२०:१—१८).

४. टबिथा म्हणजे दुर्कस या नावाची शिष्यीण सत्कर्मे करण्यास व दानधर्म देण्यात तत्पर असे (प्रे.कृ.९:३६).

५. फिबी मंडळीची सेविका पौलाची साहाय्यकारिणी होती (रोम.१६:१,२).

६. प्रिस्किल्ला एक आज्ञाधारक पत्नी, एक प्रेषितांची साहाय्यकारिणी आणि मिशनरी होती. आपल्या पतीसोबत तिने, आपल्या घरात मंडळीला जागा दिली (रोम.१६:३—५; प्रे.कृ. १८:१—३; प्रे.कृ.१८:२४—२८ बघा).

**जे वडील मंडळीसाठी आहे, ते सर्व काही ख्रिस्तजणांसाठी अनिवार्य आहे.**

| **वडील** | **पात्रता** | **सर्व ख्रिस्तजण** |
|---|---|---|
| १ तिमथी ३:२ | निर्दोष (निष्कलंक) | १ तिमथी.५:७; ६:१४ |
| १ तिमथी ३:२ | संयमी (चौकस बुध्दीचा) | १ पेत्र.१:१३; ४:७; ५:८ |
| १ तिमथी ३:२ | सभ्य (समजउदार) | तीत.२:२, ५; रोम.१२:३ |
| १ तिमथी ३:२ | आतिथ्य करणारा | रोम.१२:१३; इब्री.१३:२ |
| १ तिमथी ३:२ | शिकवण्यामध्ये निपुण | इबी.५:१२ |
| १ तिमथी ३:३ | मद्यपानासक्त नसावा (दारूबाज नसावा) | तीत.२:३; इफीस.५:१८ |
| १ तिमथी ३:३ | सौम्य (सहनशील) | फिलिपै.४:५; कलसै.३:१३; तीत.३:२ |
| १ तिमथी ३:३ | भांडणारा किंवा लढणारा नसावा (भांडण न करणारा) | थाकोब.४:२; २ तिमथी.२:२४ |
| १ तिमथी ३:३ | द्रव्याचा लोभ न धरणारा | १तिमथी.६:१०; २ तिमथी.३:२ |
| १ तिमथी ३:४ | मुले आज्ञाधारी, आदर करणारी | इफिस.६:१—४ |
| १ तिमथी ३:७ | विदेशी लोकांत आचरण चांगले | १ पेत्र.२:१२—१६ |
| तीत १:८ | न्यायाने (समतेने वागणारा) | कलसै.४:१ |
| तीत १:८ | पवित्र (समर्पित) | इफीस.४:२४; १ तिमथी.२:८ |
| तीत १:८ | संयमी (इंद्रियदमन) | गलती.५:२३ |

---

वडीलांच्या तीन पात्रता आहेत की ज्या सर्व ख्रिस्ती लोकामध्ये असणे जरूरी नाही. वडील ''एका स्त्रीचा पति'' असावा, त्यांची मुले विश्वासू ''असावे आणि तो'' ''नविन विश्वासनारा'' नसावा (१ तिमथ्यी ३:२,६, तिताला पत्र १:६). (जरी विवाहीत ख्रिस्ती व्यक्तीला एकच जोडीदार असावा, तरी अविवाहीत पूरूष किंवा स्त्री सुध्दा ख्रिस्ती बनू शकतात.)